**शालेय पोषण आहार योजनेंतर्गत**
**Plinth Area Norms प्रमाणे**
**स्वयंपाकगृहांचे बांधकाम करणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रिडा विभाग
शासन निर्णय क्रमांक: शापोआ- २०१०/प्र.क्र.४२ /प्राशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
दिनांक:- ३१ मार्च, २०११.

वाचा :-

१) केंद्र शासन, आदेश क्रमांक- F.No. 1-1/2009-Desk (MDM), दि.१२/११/२००९.
२) महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांचे पत्र क्र. मप्राशिप/सशिअ/बांध MDM/२००९-१०/३९६, दि. २८/१/२०१०.
३) केंद्र शासन, आदेश क्रमांक- F.No. 4-10/2009-Desk (MDM), दि.३०/०३/२०१०.
४) शिक्षण संचालकांचे पत्र क्र. शापोआ/स्वयं.बा./प्राशिस-३०१/२०१०-११/१९३८,दि. २३/०३/२०११.

**प्रस्तावना:-** शालेय पोषण आहार या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत स्वयंपाकगृह बांधकामासाठी केंद्र शासनाने सन २००९-१० या आर्थिक वर्षापासुन केंद्र आणि राज्यशासनाचे खर्चाचे प्रमाण ७५:२५ (केंद्र : राज्य) असे विहित केलेले आहे. तसेच शाळेतील विद्यार्थी संख्या यांचे आधारे Plinth Area Norms विहित करुन स्वयंपाकगृहांचे (Kitchen Shed Cum Store) बांधकाम करण्यास मान्यता दिलेली आहे. केंद्र शासनाने राज्यास सन २००९-१० या आर्थिक वर्षामध्ये ९२३१ स्वयंपाकगृह बांधकामास मान्यता दिलेली होती. त्यानुसार सन २०१०-११ च्या अर्थिक वर्षामध्ये रु. १२९.०९ कोटी निधीची (केंद्र : राज्य ७५:२५ हिस्सा मिळून) तरतूद राज्याच्या अर्थसकंल्पामध्ये पुरवणी मागणीद्वारे करण्यात आली आहे. तथापि केंद्र शासनाने १४८२.०० एवढाच निधी वितरीत केल्यामुळे त्याप्रमाणात १३५५ स्वयंपाकगृहे बांधकामे करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय:-** शालेय पोषण आहार या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात Plinth Area Norms नुसार खालीलप्रमाणे स्वयंपाकगृहांची बांधकामे करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र | शाळेतील विद्यार्थी संख्या (इ. १ ली ते ८ वी पर्यंत) (पटसंख्येनुसार) | स्वयंपाकगृहाचा प्रकार | क्षेत्रफळ (चौ. मीटर) | प्रती स्वयंपाकगृह खर्च मर्यादा (रुपये) |
|---|---|---|---|---|
| १ | १०० पेक्षा कमी | Type 'A' | ११.९७ | १,०४,३३१/- |
| २ | १०० ते २०० | Type 'B' | १८.०४ | १,४३,३५१/- |
| ३ | २०० पेक्षा जास्त | Type 'C' | २७.५८ | २,००,३४९/- |

२. शालेय पोषण आहार योजनेंतर्गत एकूण १३५५ स्वयंपाकगृहे खालीलप्रमाणे बांधण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | स्वयंपाकगृहाचा प्रकार | संख्या | निधी |
|---|---|---|---|
| १ | Type 'A' | ६८३ | ७१२.५८ लक्ष |
| २ | Type 'B' | २८८ | ४१२.८५ लक्ष |
| ३ | Type 'C' | ३८४ | ७६९.३४ लक्ष |
| | एकूण | १,३५५ | १८९४.७७ लक्ष |

३. शालेय पोषण आहार योजने अंतर्गत वरील १३५५ स्वयंपाकगृहांचे जिल्हा निहाय वाटप शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी करांवे. सदर स्वयंपाकगृहांची बांधकामे सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमाची अंमलबजावणी करणाऱ्या महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेमार्फत करण्यात यावीत. त्यासाठी रुपये १८९४.७७ लक्ष निधी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेकडे सुपूर्द करण्यात यावा. परिषदेने सदर बांधकामे सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमाच्या धर्तीवर करुन घ्यावीत. शिक्षण संचालक (प्राथमिक) यांनी सदर अनुदान आंहरण करुन महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांचेकडे सुपूर्द करावा.

४. यासाठी येणारा खर्च "मागणी क्रमांक ई-२, २२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०१, प्राथमिक शिक्षण, (०१) (१५), मुंबई महानगरपालिका क्षेत्राव्यतिरिक्त इतर क्षेत्रात शालेय पोषण आहार केंद्र पुरस्कृत योजना) (केंद्र हिस्सा) (२२०२ ३८०६) ३१ सहाय्यक अनुदाने" या लेखा शिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा. यासाठी शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक, आंहरण आणि संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

६. हे आदेश महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर (www.maharashtra.gov.in) प्रसिध्द करण्यात आले आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

31/3/11

(प्रकाश साबळे)

**अवरसचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.

मा.मंत्री/राज्यमंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव.

शिक्षण संचालक(प्राथमिक), महाराष्ट्र राज्य,पुणे.

महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण विभाग)
लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद.
जिल्हा कोषागार अधिकारी,(पुणे)
सर्व शिक्षणाधिकारी ( प्राथमिक), जिल्हा परिषद
वित्त विभाग (व्यय-५) /अर्थसंकल्प शाखा
निवड नस्ती,(प्राशि ४)